सामना

मंगळवार, ५ ऑक्टोबर २०२१



# रयत शिक्षण संस्था देशाचे भूषण

सातारा, दि. ४ (प्रतिनिधी) – रयत शिक्षण संस्थेत सर्वसामान्यांची मुले शिकत आहेत. या शिक्षण संस्थेत काळाच्या गरजेनुसार कौशल्यपूर्ण शिक्षण देण्यासोबतच शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मुलांना रोजगारही उपलब्ध करून दिला जात आहे. ही संस्था देशाचे भूषण असून, या संस्थेचा आदर्श देशातील इतर संस्थांनी घ्यावा, असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी केले.

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांचे प्रतिपादन

यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथे रयत शिक्षण संस्थेच्या १०२व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास आमदार बाळाराम पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर, रामशेठ ठाकूर आदी उपस्थित होते.

मंत्री उदय सामंत म्हणाले, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण क्षेत्रातील काम अमुल्य आहे. या संस्थेत साडेचार लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे काम आदर्शवत असून, संस्थेसाठी शासनाकडून सर्व सहकार्य करण्यात येईल. देशातील विद्यार्थी अन्य देशांतील विद्यापीठ पाहण्यासाठी, तेथे शिक्षण घेण्यासाठी जातात. भविष्यात रयत शिक्षण संस्था पाहण्यासाठी बाहेरील विद्यार्थी इथे येतील. तसेच, मुंबई, पुणे येथील विद्यार्थी रयत शिक्षण संस्थेत शिक्षणासाठी येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

रयत शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन समाजाने दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा केला जात आहे, असे सांगत, रयत शिक्षण संस्थेच्या जडणघडणीत प्रबोधनकार ठाकरे यांचे मोलाचे योगदान राहिले आहे, अशा शब्दांत डॉ. अनिल पाटील यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या कार्याचा गौरव केला. सामंत यांच्या हस्ते रयत विज्ञान पत्रिकेचे प्रकाशन व ई-रयत ॲपचा शुभारंभ करण्यात आला.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा